रयत शिक्षण संस्थेचे,

अण्णासाहेब आवटे आर्ट्स, कॉमर्स & हुतात्मा बाबू गेणू सायन्स कॉलेज, मंचर

ता. आंबेगाव जि. पुणे

मराठी विभाग,

महाराष्ट्र साहित्य परिषद मंचर – शाखा, कवयित्री शांता शेळके प्रतिष्ठान,मंचर व निसर्ग प्रतिष्ठान,पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित

* कृतिशील वसुंधरा काव्यसंमेलन- श्रावणशिरवा *

अहवाल

आपल्या महाविद्यालयातील मराठी विभाग व महाराष्ट्र साहित्य परिषद, शाखा-मंचर, कवयित्री शांता शेळके प्रतिष्ठान, मंचर व निसर्ग प्रतिष्ठान, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने पावसाळ्यानिमित्त 'कृतिशील वसुंधरा काव्यसंमेलन - श्रावणशिरवा' या काव्यसंमेलनाचे दिनांक २४/०८/२०२४ शनिवार रोजी आयोजन करण्यात आले होते. सदर कार्यक्रमास महाराष्ट्रातील वेगवेगळ्या नाशिक, राजगुरूनगर, पिंपरी-चिंचवड, बारामती, तळेगाव अशा विविध ठिकाणाहून सुमारे जवळपास ४५ कवी सहभागी झाले होते. त्याचबरोबर या काव्यसंमेलनात महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनीही उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवून आपल्या स्वरचित कविता सादर केल्या.

सदर काव्यसंमेलनाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे मा. प्राचार्य डॉ. एन. एस. गायकवाड होते. तर या संमेलनास महाराष्ट्र साहित्य परिषद, मंचर शाखेचे अध्यक्ष मा. दत्ताजी पायमोडे महाराष्ट्र साहित्य परिषद, खेड शाखेचे अध्यक्ष मा. संतोष गाढवे तसेच मंचर येथे काही वर्ष पी.आय. म्हणून कार्यरत असणारे मा. मोहन जाधव, निसर्ग प्रतिष्ठान पुणेचे मा. सचिव वैभव टेमकर तसेच महाविद्यालयाचे विभागप्रमुख डॉ.बी.पी.गार्डी, प्रा. डॉ. संतोष पवार प्रा.मुंढे जी.डी. व डॉ.रूपनर एस.एस. हे उपस्थित होते. काव्यसंमेलनाच्या सुरूवातीस मराठी विभागाच्या विशेष भितीपत्रकाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

सदर काव्यसंमेलनाचे प्रास्ताविक व पाहुण्यांचे स्वागत मराठी विभागाचे विभागप्रमुख प्रो. डॉ. बी.पी. गार्डी यांनी केले. या प्रस्तावनेत त्यांनी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यामागचा हेतू स्पष्ट करून श्रावणशिरवा या शांता शेळके यांच्या कविता संग्रहावरती प्रकाश टाकून निसर्गाची मानवी जीवनातील महत्त्वाची भूमिका स्पष्ट केली. तर इतर मान्यवरांनी तसेच या काव्यसंमेलनास आवर्जून उपस्थित

असलेल्या सर्व कवींनी निसर्ग, पर्यावरण, झाड, पाऊस, श्रावण महिना, पर्यावरण व त्याचे महत्त्व अशा विविध विषयांवरती स्वरचित कविता आपल्या खास अशा शैलीत सादर केल्या. या प्रसंगी मा. दत्ताजी पायमोडे, मा. वैभव टेमकर , मा. संतोष गाढवे यांनी पर्यावरण आणि पर्यावरण जागृती संबंधीचे आपले विचार व्यक्त केले. प्रस्तुत कार्यक्रमास उपस्थित असणाऱ्या सर्व मान्यवरांचे, पाहुण्यांचे, आयोजकांचे व सहभागी कवींचे आभार प्रा. मुंढे जी.डी. यांनी मानले. तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.रूपनर एस.एस. व महाविद्यालयाची विद्यार्थिनी कु. अदिती चासकर यांनी केले.या काव्यसंमेलनात जेष्ठ साहित्यिक महादेव मोरे यांना श्रद्धांजली वाहण्यात आली.

केवळ पर्यावरण संरक्षणावर कविता सादर करून लोकांमध्ये पर्यावरण संरक्षणाबद्दलची जनजागृती होणार नाही तर त्याबाबत ठाम अशी कृती करणे गरजेचे आहे या विचाराने या काव्य संमेलनातील कवींच्या हस्ते महाविद्यालयाच्या परिसरात विविध प्रकारच्या सुमारे 120 वृक्षांची लागवड केली.














vivo T1
Dr. Sachin Rupnar


vivo T1


vivo T1
Dr. Sachin Rupnar